जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** दि.०६.११.२०२४

## डोंबिवलीतील १९ बेशिस्त वाहनचालकांवर फौजदारी कारवाई

दिनांक ०३/११/२०२४ रोजी १९.१५ वा. ते १९.५० वाजताच्या दरम्यान साईबाबा मंदिर, सांगाव कडून मानपाडा चौकाकडे जाणाऱ्या वाहिनीवर, डोंबिवली पुर्व येथे फिर्यादी सुनिल बाळासाहेब उगलमुगले, वय ४९ वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस हवालदार बक्कल नंबर २७४७, नेमणुक कोळशेवाडी वाहतूक उपविभाग, कल्याण पुर्व हे साईबाबा मंदिर, सांगाव, डोंबिवली पुर्व येथे वाहतूक नियमन करणे व मोटार वाहतूक कायदयाचे उल्लघंन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करणेकामी शासकीय कर्तव्यावर असताना, मानपाडा चौकाकडे जाणाऱ्या वाहिनीवर रिक्षा क्रमांक एम.एच. ०५ सी.पी.२६२९, एम.एच ०५ डि.क्यु १२९९, एम.एच.०५ डि.झेड.०३३१, एम.एच.०५ बि.जी.१८८२, चारचाकी गाडी क्रमांक एम.एच. ०१ ए.आर.७२२५ व एम.एच.०५ ए.एस ०३०३ वरील चालक व इतर १० ते १२ वाहनांवरील चालक यांनी उद्देशपुर्वक, धोकादायकरित्या विरुध्द दिशेने सार्वजनिक रहदारीच्या रस्त्यावर हयगयीने वाहन चालवून वाहतुकीच्या रस्त्यावर येणाऱ्या जाणाऱ्या मार्गावर अटकाव केला व इतर व्यक्तींना गैरपणे निरुध्द केले तसेच वाहनचालक यांना देखील विरुध्द दिशेने वाहने चालविण्यास अपप्रेरणा देवून रस्ते सुरक्षा मानकांचा भंग करून सुमारे अर्धातास वाहतूकीस अडथळा निर्माण करताना आढळुन आले.

सदर घटने बाबत मानपाडा पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर क्रमांक १२०४/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ५४,१२६ (२), २८१, २८५ सह एमव्हीडीआर ४/१२२, १७ (अे), १८४/१७७ मोटार वाहतूक कायदया सह रस्ता सुरक्षा मानके नियम कलम १९०(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाहतूकीच्या नियमांचा भंग करणाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर श्री.पंकज शिरसाठ यांनी आदेश दिले आहेत.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर